# अनधिकृत बॅनर लावणारे नगरपरिषद प्रशासनाचे जावई आहेत काय? त्यामुळेच अतिक्रमण विभाग अनधिकृत बॅनरवर कारवाई करत नाही?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २२४ ■ शनिवार दि.३ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 224 ■ Saturday Dt.3 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# गेवराई शहरात अनधिकृत पोस्टर आणि बॅनरचा भस्मासुर, अतिक्रमण विभागाचे झोपीचे सोंग?

## संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करून शहरातील अनधिकृत बॅनर काढा?

## नगरपरिषदेच्या विनापरवानगी शिवाय शहरात बॅनर लागले कसे? चमकोगिरी करणाऱ्या 'पोस्टर बॉईज'नी पुन्हा तोंड वर काढले?

गेवराई । प्रतिनिधी

शहरांच्या बकालपणाला नगरपरिषद प्रशासनाच्या अतिक्रमण विभागाच्या उदासीनतेमुळे हातभार लागत आहे. या शहरांना अनधिकृत बॅनरचा विळखा पडलेला आहे. विशेषत: या अनधिकृत बॅनरवर आणि बॅनरलावणाऱ्यांविरोधात नगरपरिषद प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याने बिनधास्तपणे मोठ्या संख्येने या शहरात बाराही महिने अनधिकृतपणे राजकीय घटकांचे बॅनर लागले जात आहेत. मोबाईल शॉपी च्या दुकानधारकाचे कार्यक्रम संपल्यावर पंधरा दिवस, महिना काय, दोन महिने उलटल्यावरही कारवाई होत नसल्याने बॅनर त्या त्या राजकारण्यांची व दुकानदाराची अनधिकृत परवानगी न घेता प्रसिद्धी करत शहरांच्या सौंदर्याला काळिमा फासत आहे. शहरामध्ये मोठ्या संख्येने लागणाऱ्या अनधिकृत बॅनरमुळे त्या त्या न.प. प्रशासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. न.प. प्रशासनाचे नुकसान झाले तरी चालेल, पण राजकारण्यांच्या व दुकानदाराच्या अनधिकृत बॅनरवर कारवाई करून त्यांची नाराजी ओढावून घेण्याविषयीची न.प. अतिक्रमण विभागाची बोटचेपेपणाची भूमिका नागरिकांचा संताप वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे.

शहराला बकालपणा आणणाऱ्या अनधिकृत बॅनरवर दररोज तातडीने कारवाई करून शहराला बकालपणा लागू न देण्यासाठी खबरदारी घेण्याची जबाबदारी न.प.च्या अतिक्रमण विभागाची आहे. अनधिकृत बॅनर




लावणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे अधिकारही न.प. प्रशासनाला आहेत; परंतु अधिकाराचा वापर करण्याचे धाडस न.प. प्रशासनाचा अतिक्रमण विभाग दाखवत नाही. दररोज शहरातील अनधिकृत बॅनर जर काढले जात नसतील, तर अतिक्रमण विभागातील संबंधितांना न.प. प्रशासन वेतन कशासाठी देत आहे, याबाबत गंभीरपणे विचारमंथन करण्याची वेळ आज आलेली आहे. फुकटात प्रसिद्धी मिळवणाऱ्या आणि चमकोगिरी करणाऱ्या 'पोस्टर बॉईज'नी पुन्हा तोंड वर काढले आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशाची पायमल्ली करत शहरभर पुन्हा पोस्टरचे तसेच पॉम्प्लेट आणि बॅनरचे पेव फुटले असून गेवराई, पोलिसांना पुन्हा डुलकी लागली आहे. शहराच्या विद्रूपीकरणात राजकीय पक्षांबरोबर खासगी शैक्षणिक संस्था, कोचिंग व मोबाईल शॉपी वाल्यांचे मोठे मोठे बॅनर तसेच क्लासेसचे मोठे योगदान आहे. नगर परिषदेच्या हद्दीतील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बॅनर–पोस्टर्स, फलक लागलेले असतात. नगरपरिषदेच्या वतिने कोणतीही परवानगी न घेता हे फलक लागतात. न.प.परिषेदकडून हे बॅनर काढण्यासाठी कारवाईही होत नाही. किंवा बॅनर लावणाऱ्यांवर गुन्हेही दाखल होत नाहीत अशी आजवरची स्थिती आहे. मात्र आता न.प.ने याबाबत हालचाल अद्याप केली नसल्याने दिसून येत आहे.

अनधिकृत बॅनरबाजीमुळे न.प.वर टीका होत आहे. यामुळे नगर परिषदेचे आजवर कोट्यवधी रुपयांचे जाहिरात कराचे उत्पन्न बुडले आहे. बॅनर वाहतुकीसही अडथळे ठरत आहेत. यामुळे लहान–मोठे अपघात घडण्याच्या घटनाही घडल्या आहेत. बस स्टँड वर पायी चालणाऱ्या ला हे बॅनर गैरसोयीचे ठरत आहेत. मात्र दिल्लीचे पथक हे तपासणी करून गेल्यानंतर मात्र नगर परिषदेच्या अतिक्रमण पथकाची कारवाईही शिथिल झाली आणि शहर पुन्हा एकदा अनधिकृत बॅनरने विद्रुप झाले आहे.मात्र दिल्लीचे पथक हे तपासणी करून गेल्यानंतर मात्र न.प.च्या अतिक्रमण पथकाची कारवाईही शिथिल झाली आणि गेवराई शहर

▶ पान २ वर

माजलगाव एमआयडीसीतील प्रश्नसंदर्भात उद्योजकांसमवेत आ. प्रकाश सोळंके यांची बैठक

## एमआयडीसीतील सर्व अडचणी सोडवणार : आ. सोळंके



माजलगाव । प्रतिनिधी

येथील एमआयडीसी मध्ये उद्योग, धंदे उभारण्यासाठी येत असलेल्या अडचणी संदर्भात उद्योजक आणि आमदार प्रकाश सोळंके यांची नुकतीच बैठक पार पडली असून एमआयडीसीतील सर्व अडचणी सोडवण्यासाठी आपण लवकरच उद्योग मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे आश्वासन आमदार सोळंके यांनी उद्योजकांना दिले. आमदार सोळंके यांच्या निवासस्थानी औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग करताना येणाऱ्या समस्या संदर्भात मीटिंग विथ ब्रेकफास्ट पार पडली. यावेळी उद्योजकांनी आमदार सोळंके यांच्यासमोर अडचणींचा पाढा वाचला असता मराठवाड्यातील अग्रगण्य औद्योगिक वसाहत म्हणून माजलगाव वसाहतीला नवी ओळख मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार तसेच एमआयडीसीतील पाणीपुरवठा, रस्ते व इतर सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. विजेसाठी लवकरच ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात येईल. उद्योग उभारणीत असलेल्या अनेक अडचणींचा ही निपटारा लवकरच करण्यात येईल

▶ पान २ वर

## आष्टी तालुक्यातील मंगरूळ परिसरामध्ये बिबट्याचा मुक्काम

### अनेक श्वानांचा पाडला फडशा; वनविभाग घटनास्थळी बिबट्याचे ठसे असल्याचे निष्पन्न



आष्टी । प्रतिनिधी

मंगरूळ परिसरातील मोठ्या प्रमाणावर बागायती क्षेत्र असल्याने ऊसाची लागवड आहे. पिकाचा आधार घेत बिबटचा दडण धरुन या तीन दिवसापासून मुक्काम ठोकला असून अनेक श्वानाचा फाडशा पाडला आहे. वनविभागाने याची दखल

> नागरीकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी
>
> बिबट्या चा वावर असलेल्या परिसरात ट्रॅप कॅमेरा लावण्यात येणार असून वनविभाग लक्ष ठेवून आहे. नागरीकांनी घाबरून न जाता बाहेर पडताना काळजी घ्यावी व लहान मुलांना एकटे सोडु नये वनविभाग दक्ष आहे.
>
> – संजय ढगे, वनपरिक्षेत्र अधिकारी, आष्टी

घेत घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, बिबटचाचे ठसे व शेतात बिबटचाचे केस वनविभागाला आढळून आले आहेत. बिबट प्राणी असल्याचा दावा वनविभागाने केला आहे. यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबटचाचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

आष्टी तालुक्यातील मंगरूळ परिसरात बागायती क्षेत्र

▶ पान २ वर

## दारुड्या पुतण्याने दारूसाठी चुलतीच्या नरडीचा घेतला घोट



सिरसाळा । प्रतिनिधी

दि.१ मे रोजी दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने वय वृद्ध चुलतेचा कुऱ्हाडीने वार करत खून केल्याची घटना परळी तालुक्यातील शिरसाळा पोलीस स्टेशन हद्दीतील काळेवाडी येथे घडली आहे. परीमळा बाबुराव कावळे वय ६५ रा. कावळेवाडी तालुका परळी वैजनाथ असे मयताचे नाव आहे तर आरोपी दारुडा पुतण्या चंद्रकांत धुराजी कावळे वय ४५ राहणार कावळेवाडी त्याचे असे नाव आहे. दुपारी ३ वाजून ३० मिनिटांनी वाजताच्या दरम्यान ही घटना घडली आहे. आरोपी चंद्रकांत कावळे हा सतत दारू पिण्यासाठी पैशाची मागणी परिमळा कावळे यांच्याकडे करत असे. काल दिनांक १ मे रोजी देखील आरोपी चंद्रकांत हा पैशाची मागणी करत होता. परिमळा कावळे यांनी पैसे देण्यास नकार दिला. या रागाने आरोपी चंद्रकांत कावळे यांनी सोबत असलेल्या कुऱ्हाडीने परिमाळा कावळे यांच्या अंगावर /डोक्यावर सपासपा वार करून त्यांना ठार केले. ठार करून आरोपी चंद्रकांत कावळे फरार झाला आहे. घटनास्थळी सिरसाळा पोलीस स्टेशन केज चे पोलीस उपाधीक्षक यांनी तात्काळ भेट दिली आहे. याप्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा

▶ पान २ वर

# कामगारांना सरकारी योजना मिळवून देण्यासाठी बीड जिल्ह्यात व्यापक मोहिमेची सुरुवात

गेवराई । प्रतिनिधी

दिनांक १ मे २०२५ एक्शन एड असोसिएशन आणि आझाद क्रांती कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सन्मानित कामगार, सुरक्षित भविष्य मोहिमेची सुरूवात आंतरराष्ट्रीय श्रमिक दिनाच्या निमित्ताने १ मे २०२५ रोजी आझाद क्रांती कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने गेवराई तालुक्यातील राजापूर या गावातून करण्यात आली.



हजारो कामगारांना सरकारी कल्याणकारी योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी एक विशाल मोहिम सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे नेतृत्व एक्शनएड असोसिएशन आणि आझाद क्रांती कामगार युनियन ही संघटना करत आहे. ही मोहिम एक्शन एडच्या राष्ट्रीय पातळीवरील उपक्रमा अंतर्गत सन्मानित कामगार, सुरक्षित भविष्य सरकारी योजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी मोहिम या कार्यक्रमाचा भाग आहे, ज्याचे उद्दिष्ट एका वर्षात देशातील १०० जिल्ह्यात १० लाख कामगारांना सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये समाविष्ट करणे आहे.

एक्शन एडचे सहायक संचालक श्री तनवीर काझी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे की, या मोहिमेद्वारे आम्ही देशभर १०,००० 'श्रमिक साथी' तयार करीत आहोत, जे जमीनीवर १० लाख कामगारांना माहिती, नोंदणी आणि सरकारी योजनांपर्यंत पोहोचण्यात मदत करतील. प्रत्येक जिल्ह्यात १०० श्रमिक साथी कार्यरत असतील. याबरोबरच, जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायत आणि स्थानिक समुदायाच्या सहकार्यातून मोहिमेला पुढे नेले जाईल.

या मोहिमेस प्रारंभ करताना आझाद क्रांती कामगार युनियन संघटनेच्या अंतर्गत बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी, ग्रामीण भागामध्ये नोंदणी सहाय्य शिबिरे आयोजित केली जातील, जनजागृती कार्यक्रम तयार केले जातील आणि स्थानिक रेडिओ, डिजिटल माध्यमे आणि माहिती साहित्याद्वारे (खएउ) कामगारांना जागरूक केले जाईल. याशिवाय, पंचायत स्तरावर जिल्हाधिकार्यांसोबत व संबंधित विभागांसोबत समन्वय बैठका आयोजित करून योजनांच्या चांगल्या कार्यान्वयनाच्या दिशेने काम केले जाईल.

या मोहिमेचा उद्देश विशेषतः असंघटित आणि अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांना लाभ मिळवून देणे आहे, जसे की ग्रामीण भागातील कामगार, कृषी कामगार, विट भट्टीचे कामगार, बांधकाम कामगार, घरेलू महिला कामगार, कचरा गोळा करणारे, स्थलांतरित कामगार, गाडी चालवणारे कामगार, आणि मनरेगा कामगार. भारतामध्ये करोडो कामगार आजही पीएम–स्वनिधी, आयुष्मान भारत, उज्वला योजना, पेन्शन योजनां, सार्वजनिक वितरण प्रणाली, महिलांसाठी मासिक सहाय्य योजना, आणि बांधकाम कामगार कल्याण मंडळ यांसारख्या योजनांपासून वंचीत आहेत. याचे मुख्य कारण जागरूकतेचा अभाव, कागदपत्रांचा अभाव, डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि संस्थात्मक सहाय्याची अनुपलब्धता आहे.

या मोहिमेचा उद्देश फक्त तात्कालिक नोंदणी सहाय्य देणे नाही, तर एक दीर्घकालीन समर्थन यंत्रणा स्थापित करणे आहे, ज्यामुळे कामगार कायमस्वरूपी सशक्त होऊ शकतील. अशा या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये आझाद क्रांती कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांनी सहभागी व्हावे असे आवाहन १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त गेवराई तालुक्यातील राजापूर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात संघटनेचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांनी सांगितले. या कार्यक्रमामध्ये आझाद क्रांती कामगार युनियनच्या उपाध्यक्ष मंगलताई पवार आणि सचिव कविताताई डोंगरे यांनीही विचार व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आझाद क्रांती कामगार युनियनचे गेवराई तालुका संघटक शाहीरखा चांदखा पठाण आणि असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार पठाण अंजुम, चव्हाण राजूबाई, सविता गवते, भागीत्रा गवते, मंदा पाटेकर, सीमा लोखंडे, राणीबाई जाधव, मंगल गवते, मंगल वाघमारे यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार बंडू उरुणकर यांनी मानले.



# वंजारवाडी गावातील जो आयएएस-आयपीएस अधिकारी होईल त्यांना पाच लाख रुपये बक्षीस देणार : ॲड. सर्जेराव तांदळे

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथिल छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये आज महाराष्ट्र दिनानिमित्त अध्यक्षिय भाषणावेळी बोलत असताना ॲड. सर्जेराव तात्या तांदळे म्हणाले की, मुलांनी बिरुदेव डोने यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुण उज्वल भविष्य घडवावे. प्रचंड इच्छाशक्ती असेल तर यश निश्चित मिळते. आदर्श गाव म्हणुन वंजारवाडी जिल्हा स्तरावर आदर्श ठरली आहे. आता शैक्षणिक क्षेत्रातही आपल्याला गगणभरारी घ्यायची आहे. तुम्ही शिक्षणाचे ध्येय ठेवा मी सक्षमपणे तुम्हच्या पाठिशी उभा आहे. वंजारवाडी गावातील शाळेत शिक्षण घेवुन जो कोणी आयएएस–आयपीएस अधिकारी होईल त्यांना मी पाच लाख रुपये बक्षीस देणार असे वचन तात्यासाहेब यांणी दिले. यावेळी तात्यांनी महाराष्ट्र राज्याची निर्मिती, व कामगार दिनाची माहिती सविस्तरपणे विद्यार्थ्यांना सांगितली.

सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन करुन ग्रामपंचायत कार्यालय, जि.प.प्रा.शाळा व मातोश्री विद्यालयामध्ये ध्वजारोहन करण्यात आले. पांडुरंग नाना राख यांणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक नागरगोजे सर यांणी केले.

जि.प. शाळेचा निकाल भारती मॅडम यांणी जाहिर केला. यावेळी व्यासपिठावर मा.सौ. मोनाली अरुण धुरंधरे, समाजसेवक पांडुरंग नाना राख, ग्रामपंचायत अधिकारी दिपक लांडे, अंकुश आण्णा खाडे, दिलिप खाडे, अंकुश तांदळे, आजिनाथ खाडे, नागरगोजे सर, भारती मॅडम, नागरगोजे मॅडम, भुतकर सर, जाधव सर, आंधळे सर, डोंगरे सर, वनवे मॅडम, कुटे मॅडम, तांदळे मॅडम, राख मॅडम, मोराळे मॅडम, कुटे मॅडम, घरत सर, तांदळे सर, बेग सर, नागनाथ सातपुते, तात्याराम बाप्पु, नंदु पवळ, दिनकर तांदळे, सौ. सुरेखा घोडके उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बिनवडे सर, हानुमंत दादा तांदळे, प्रदिप बाप्पु तांदळे, वाघमारे डि.डि. लक्ष्मण शेंडगे यांणी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लोमेश तांदळे सर यांणी केले.

# अनिल जगताप यांच्या उपस्थितीत अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती!

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी / व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना बीड जिल्हाप्रमुख मा. अनिल दादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत, ओबीसी / व्हिजेएनटी सेल जिल्हाप्रमुख श्री. मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून पार पडली.



अशोक दुधाळ हे सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करणारे कार्यकर्ते असून, ओबीसी व व्हिजेएनटी समाजाच्या हक्कांसाठी नेहमी पुढाकार घेत आले आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर ओबीसी आणि व्हिजेएनटी समाजाला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची निष्ठा व संघटन कौशल्य, तसेच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा वारसा हे प्रेरणास्थान मानून, अशोक दुधाळ हे पक्षवाढीच्या कामात स्वतःला झोकून देतील आणि सर्व घटकांना बरोबर घेऊन प्रभावीपणे कार्य करतील, अशी अपेक्षा वरिष्ठ नेतृत्वाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर अशोक दुधाळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ही जबाबदारी मोठी असून, पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासाला मी पात्र ठरेल. समाजाच्या न्याय हक्कांसाठी मी संघर्ष करत राहीन आणि शिवसेनेच्या ध्येयधोरणांनुसार कार्य करीन.

# राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा पुरस्कारांचे वितरण

बीड । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समिती, बीड मार्फत सन २०१९–२० मधील जिल्हा क्रीडा पुरस्कारांचे वितरण मा. राज्यमंत्री, श्री. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते १ मे २०२५ रोजी पोलीस मुख्यालय, बीड येथे करण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी दिली.

पोलीस मुख्यालय, बीड येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिनांच्या शासकीय ध्वजारोहन प्रसंगी उद्योग व सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री मा.ना.श्री. इंद्रनील अनिता मनोहर नाईक यांच्या हस्ते तायक्वाँदो खेळाचा आंतरराष्ट्रीय खेळाडु श्री. अविनाश भरत पांचाळ (गुणवंत क्रीडा मार्गदर्शक), तायक्वाँदो प्रशिक्षीका श्रीमती जयश्री अविनाश बारगजे (गुणवंत क्रीडा संघटक / कार्यकर्ती पुरस्कार), राष्ट्रीय शालेय तायक्वाँदो सुवर्णपदक विजेत खेळाडु कु. गौरी कमलेश मुंदडा (गुणवंत खेळाडु पुरस्कार महिला) व राष्ट्रीय सुवर्णपदक विजेता तायक्वाँदो खेळाडु प्रणवकुमार दत्ता सिरसाठ (गुणवंत खेळाडु पुरस्कार पुरूष) यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व प्रत्येकी १० हजार रूपये रोख देऊन जिल्हा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



यावेळी मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्स, मा. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आदित्य जीवने, मा. जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. नवनित कॉवत, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर, महाराष्ट्र राज्य तायक्वाँदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबईचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०१९–२० चे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे क्रीडा अधिकारी श्री. अनिकेत काळे, श्री. कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक श्री सतिष राठोड, श्री. अविनाश पाटील, श्री. रेवननाथ शेलार, श्री. धनेश करांडे, श्री. जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, श्रीमती प्रिती काळे यांनी परिश्रम घेतले.

# पात्रुड येथे शेड नसल्याने प्रवासी एसटीसाठी उन्हातच ताटकळत



पात्रुड । प्रतिनिधी

खामगाव–पंढरपूर महामार्गावर पात्रुड बस थांबा हा अत्यंत वर्दळीचा व सतत प्रवाशांनी गजबजलेला असतो. येथून लांब पल्ल्याच्या बसेस जातात, त्यामुळे येथे प्रवाशी संख्या जास्त असते. मात्र, येथे एसटी बसथांब्यावर सावलीसाठी शेड नसल्याने प्रवाशांना घामाघूम होत बसची वाट पाहात उभे राहावे लागते. त्यामुळे येथे प्रवाशांच्या संख्येच्या तुलनेत शेड उभारण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.पंढरपुर, नांदेड,नागपूर प्रवाशांना अत्यंत सोयीचा तसेच परभणी ते कोल्हापूर आणि मुंबईला जोडणारा मुख्य बस थांबा असून या ठिकाणी दोन्ही बाजूला सतत प्रवाशी वर्दळ असते. प्रवाशांना थांब्याकरीता निवारा शेड नसल्याने प्रवाशी नागरिकांना उन, पावसात उभे राहून प्रवाशी वाहनांची वाट पहात तासनतास तिष्टत उभे राहावे लागते. या ठिकाणी मुतारीची सुविधा नसल्याने महिला प्रवाशांची कुचंबणा होत आहे. पात्रुड येथे दोन्ही बाजूला प्रवाशांसाठी बसथांबा शेडची मागणी गेली कित्येक वर्षांपासून नागरिकांकडून होत आहे.

खामगाव–पंढरपूर महामार्ग रुंदीकरणं करताना प्रवाशांच्या मूलभूत सोयी सुविधांचा विचार केला गेला नाही. रोड रुंदी करणादरम्यान या सुविधांकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले असून लवुळ फाट्यावर व समोरच्या बाजूला आवश्यक जागा सोडली नाही. यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होत असून गेल्या आठ वर्षांपासून महामार्गावरील निवाराशेड गायब झाले आहेत. महामार्गाचे रुंदीकरण सुरू होणे पूर्वी पात्रुडला निवाराशेड होती.

गेली सहावर्षांपूर्वी जी गायब झाली ती आजतागायत गायबच आहे.गावात जाणाऱ्या चौकात व लोनगाव फाट्यावर महामार्गावरील दुभाजक गायब असून सव्हिस रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने पार्किंग करून हॉटेलमध्ये नागरिक बसलेले असतात. त्यामुळे सर्व्हिस रस्त्यावर वाहातुकीस अडथळा होत असून सतत वाहतूक कोंडी होत आहे.

**नागरिकांकडून आंदोलनाचा इशारा**

पात्रुड ग्रा,पंचायतचे माजी उपसरपंच शेख युसूफ म्हणाले की, महामार्ग रुंदीकरण करताना नियोजित आराखड्यात बसथांबासाठी जागेची व्यवस्था असतानाही प्रशासनाने जागा अधिग्रहित केली नाही. हॉटेल व्यवसायिक आणि अधिकारी यांचे लागेबांधे असल्याने जागा अधिग्रहित करण्यासाठी जाणीवूर्वक विलंब केला जात आहे. त्यामुळे निवारा शेडची कामे तातडीने होणे गरजेचे आहे. तसेच महामार्ग प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अन्यथा आगामी काळात मोठे आंदोलन केले जाईल.

# लपून बसल्याच्या आरोपातून मुंजा पांचाळ सह इतरांची निर्दोष मुक्तता

पात्रुड । प्रतिनिधी

चोरी करण्याच्या उद्देशाने दि.८ जानेवारी २०१८च्या रात्री १:३० वाजण्याच्या सुमारास निपाणी टाकळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात जिप क्र.एम एच ३० बी १८४९ महिंद्रा कमांडर मध्ये लपून बसल्याच्या आरोपातून आरोपी मुंजा रखमाजी पांचाळ, समाधान पांडुरंग पौळ यांची आरोपीचे विधिज्ञड.नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर माजलगाव येथील दुसरे सत्र न्यायाधीश श्री धर्माधिकारी साहेब यांनी दि. ३० एप्रिल रोजी सबळ पुराव्याअभावी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

जानेवारी २०१८च्या रात्री १:३० वाजण्याच्या सुमारास निपाणी टाकळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात जिप क्र.एम एच ३० बी १८४९ महिंद्रा कमांडर मध्ये लपून बसल्याची फिर्याद मुंबई पोलीस कायदा कलम१२२ प्रमाणे आरोपी मुंजा रखमाजी पांचाळ व समाधान पांडुरंग पोळ यांच्या विरोधात दि.९जानेवारी २०१८रोजी सहाय्यक फौ.भास्कर शंकरराव कांबळे यांनी पो.स्टे.माजलगाव ग्रामीण येथे फिर्याद दिली होती, सदर फिर्यादी वरुन आरोपी विरोधात गु.र.न.०५/२०१८ अन्वये मुंबई पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे नोंदवण्यात आला होता, प्रकरणात तपासणी अंमलदार ए एस आय राठोड यांनी आरोपी विरुद्ध आरोपपत्र दाखल केले, त्यानंतर प्रकरणात फिर्यादी, तपासी अंमलदार व इतर साक्षीदार यांचे जबाब झाल्यानंतर, सरकार पक्षाचा पुरावा ग्राह्य धरुन पहिले प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री बी व्ही बुरांडे यांनी आरोपींना प्रत्येकी सहा महिन्यांचा कठोर कारावास व ५००/रुपये दंड(दंड न भरल्यास १५दिवस कठोर कारावास)शिक्षा ठोठावली होती,सदर शिक्षेच्या नाराजीने आरोपींनी माजलगाव येथील सत्र न्यायालयात फौजदारी अपील क्रमांक १४/२०१९ दाखल केले होते.

सदर प्रकरणात आरोपीचे विधिज्ञ ड.नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर आरोपी मुंजा रखमाजी पांचाळ, समाधान पांडुरंग पौळ यांची सबळ पुराव्याअभावी माजलगाव येथील दुसरे सत्र न्यायाधीश श्री भास्कर जी धर्माधिकारी साहेब यांनी दि. ३० एप्रिल रोजी निर्दोष मुक्तता केली.

पान १ वरून...

## गेवराई शहरात अनधिकृत पोस्टर आणि बॅनरचा भस्मासुर...

पुन्हा एकदा अनधिकृत बॅनरने विद्रुप झाले आहे. बॅनरची परवानगी न घेताच बॅनर लावले.

शहरामध्ये बहुतेक ठिकाणी छोट्या बॅनरची परवानगी घेऊन मोठे बॅर्नर लावतात. ही सत्य परिस्थिती असून येथून पुढे बॅनर कोणत्या प्रिंटरकडून छापला आहे, याची नोंद करण्याची सक्ती करण्यात येणार आली पाहिजे आता प्रत्येक नागरिकांनी पुढाकार घ्यावा. अनधिकृत बॅनरविरोधात व्यापक प्रमाणावर जनजागृती होऊन चळवळ उभी राहिल्यास न.प. प्रशासनाच्या अतिक्रमण विभागाला तसेच अनधिकृत बॅनर लावणाऱ्यांनाही यामुळे धडा बसेल, चपराक बसेल. चला तर ही चळवळ तुमच्या–आमच्यापासून सुरू करू या, वेळ दवडून आता चालणार नाही.

## एमआयडीसीतील सर्व अडचणी सोडवणार : आ. सोळंके

यासाठी आपण राज्याचे उद्योग मंत्री यांची भेट लवकरच घेणार असल्याचे आश्वासन आमदार सोळंके यांनी दिले. ही मीटिंग होण्यासाठी भगवानराव शेजुळ यांनी प्रयत्न केले.

बैठकीस युवा उद्योजक वीरेंद्र दादा सोळंके, दिनकर शिंदे, व्यापारी महासंघाचे तालुका अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, गोविंद बजाज, राहुल जगताप, प्रणित होके पाटील, लक्ष्मीनारायण मुंदडा, प्रेम तापडिया, श्री. मुळे, अश्विन राठोड, जलाल पठाण अनेक युवा उद्योजकांची उपस्थिती होती.

## आष्टी तालुक्यातील मंगरूळ परिसरामध्ये बिबट्याचा मुक्काम

असल्याने येथील शेतकरी उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली आहे. या उसाच्या पिकाचा आधार घेऊन बिबट्याने सुरेश दिंडे यांच्या शेतात मुक्काम ठोकला या ठिकाणी बिबट्याचे वनविभागाला ठसे व केस देखील आढळून आले आहेत बिबट्याने परिसरातील अनेक श्वानाचा फाडशा पाडल्याचे देखील शेतकऱ्यांनी सांगितले आहे. शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. श्वानाची शिकार करताना एखाद्या बळी जाऊ नये यासाठी वनविभागाने तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. घटनेची माहिती कळताच वन परिक्षेत्र अधिकारी संजय ढगे यांच्या आदेशावरून वनरक्षक अशोक काळे, वनरक्षक बाबासाहेब शिंदे, वनरक्षक किरण पंदलवाड, वन कर्मचारी युनूस शेख, मोरे, वनपाल जायभाय आदींनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे.

## दारुडच्या पुतण्याने दारूसाठी चुलतीच्या नरडीचा घेतला घोट

दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत दाखल होती. मयताचे शवविच्छेदान साठी शासकीय रुग्णालयात प्रेत पाठविण्यात आले होते. अधिक तपास सिरसाळा पोलीस करत आहेत.

**आरोपी विरोधात काही दिवसापूर्वीच दिलेली होती तक्रार**

मयताचे नातेवाईक या घटनेबाबत बोलताना मयत परिमळा कावळे यांचे नातू प्रदीप शेठ यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले की आरोपी चंद्रकांत कावळे हा दारू पिण्यासाठी सतत पैशाची मागणी करून आजी परिमळा कावळे यांना त्रास देत होता. याबाबत सिरसाळा पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दिला होता. सिरसाळा पोलीस प्रशासनाकडून तक्रारी अर्जाची योग्य दखल घेण्यात आली नव्हती. तेव्हाच योग्य कारवाई सिरसाळा पोलिसांनी केली असती तर आमची आजी परीमळा कावळे यांचा हा प्रकार घडला नसता.




# शिरूर कासार येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन

शिरूर कासार । प्रतिनिधी

महसूल व वन विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील नागरिकांची कामे जलद गतीने व्हावीत, महसूल विभाग हा शासनाचा महत्त्वाचा विभाग असून शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनांची अंमलबजावणी तसेच शेतकऱ्याशी संबंधित असणारे जिव्हाळ्याचे प्रश्न तातडीने मार्गी लागावेत, तसेच त्या त्या भागातील शेतकऱ्यांच्या, गोरगरिबांच्या, विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींचा वेळेवर निपटारा व्हावा, यासाठी प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्याचे शासनाचे निर्देश आहेत.




बीड जिल्ह्यात महसूल प्रशासन पारदर्शक व गतिमान व्हावे, जनमानसात महसूल विभागाची प्रतिमा उंचावी यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पाठपुराव्यातून व बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार येथे २ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराज व अभियान राबविण्यात आले.

शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा असलेला प्रश्न म्हणजे शेत रस्ते. उपस्थित शेतकऱ्यांना गावनकाशावरील शेतरस्ते, वहिवाटीचे शेतरस्ते, ज्या शेतकऱ्यांना पूर्वी रस्ता उपलब्ध नाही त्यांना सर्वे नंबर बांधावरून उपलब्ध करून दिले जाणारे रस्ते, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विहित नमुन्यांमध्ये ७ अर्ज स्वीकारण्यात आले. तसेच आठवडाभर प्रत्येक गावामध्ये गाव नकाशांचे वाचन करून नकाशात नोंद असलेले परंतु वापरात नसलेल्या रस्त्यांची माहिती संकलित करण्यात आली व ते रस्ते खुले करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शासनाच्या जिवंत सातबारा मोहिमेच्या अनुषंगाने मयत खातेदारांच्या जागी त्यांचे वारस नोंद घेण्यासाठी प्रक्रियेची माहिती देऊन वारसांचे २२ अर्ज स्वीकारण्यात आले.

शेत जमिनीची स्वखुशीने आणि सहमतीने वाटणी व्हावी, शेतकऱ्यांची कोर्टकचेरी कमी व्हावी, त्यांचा वेळ, पैसा व श्रम वाया जाऊ नयेत यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ (२) अन्वये वाटणी साठीच्या कार्यपद्धतीची माहिती देऊन २ अर्ज स्वीकारण्यात आले. बारा वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून एकमेकांकडे असलेल्या शेत जमिनींची अदलाबदल करण्यासाठी सलोखा योजनेची सविस्तर माहिती देऊन या अंतर्गत ५ अर्ज स्वीकारण्यात आले. सातबारा मध्ये क्षेत्र दुरुस्ती व नावांची दुरुस्ती यासाठीच्या कायदेशीर कार्यपद्धतीची माहिती देऊन १० अर्ज स्वीकारण्यात आले.

जून जुलै मध्ये विद्यार्थ्यांना शाळा आणि महाविद्यालयात प्रवेश घेत असताना लागणाऱ्या विविध प्रमाणपत्रासाठी गैरसोय व विलंब होऊ नये यासाठी या शिबिराच्या माध्यमातून २२७ उत्पन्न प्रमाणपत्र, १५ रहिवासी प्रमाणपत्र, ३५ राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र व ७६ जात प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकृती करून वितरण करण्यात आले.

अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत ४७ लाभार्थींना डिजिटल रेशन कार्डचे वितरण करण्यात आले. सामाजिक अर्थसहाय्य योजनेसाठी च्या प्रलंबित ३५ लाभार्थींचे डीबीटीसाठी आधार अपडेटेशन व मोबाईल लिंकिंग करण्यात आले. याशिवाय शासनाच्या महत्त्वाकांक्षी शेतकरी ओळखपत्र मोहिमेअंतर्गत उपस्थितांपैकी २२ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान हे प्रत्येक महसूल मंडळाच्या ठिकाणी घेण्यात येणार असून, प्रत्येक ठिकाणी एका वर्षात चार वेळेस घेण्यात येणार आहे, याचा ग्रामीण भागातील शेतकरी, तसेच इतर नागरिकांना जलद सेवा पुरविण्यासाठी फायदा होणार आहे. यामुळे महसूल प्रशासन अधिक पारदर्शी, जबाबदार, गतिमान व उत्तरदायी या भूमिकेतून जनतेसमोर जाणार आहे.

यावेळी तहसीलदार सुरेश घोळवे, नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर, निवासी नायब तहसीलदार शिवनाथ खेडकर, निवडणूक नायब तहसीलदार विजय इंगळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी शिवदास गावडे, मंडळ अधिकारी निळकंठ सानप, सरपंच कालिदास आघाव, सहाय्यक महसूल अधिकारी युवराज नागरगोजे, सुषमा पवार, मकरंद गोले, तृप्ती वडमारे, महसूल सहाय्यक संजय राजपूत, दत्ता डाकोरे, अश्विनी डमाळे, सुरेश बडे, अशोक जाधव, अशोक एकम, ग्राम महसूल अधिकारी शब्बीर पठाण, सीमा रुद्रे, सचिन मिसाळ, सुजान जाधव यांच्यासह शिरूर कासार महसूल मंडळातील ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहाय्यक, तहसील कार्यालयातील विविध विभागाचे ऑपरेटर, महसूल सेवक, सीएससी / सेतू सुविधा केंद्राचे प्रतिनिधी तसेच मंडळातील शेतकरी खातेदार उपस्थित होते. सर्व नागरिकांनी या शिबिरामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.


# बेलापुरीत प्रथमच मराठा बांधवांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

३० एप्रिल रोजी सकाळी बीड तालुक्यातील बेलापूरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती गावातील मराठा बांधवांकडून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी १०:०० वाजता तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस सरपंच अजय (नाना) घोडके, उपसरपंच विकास (भाऊ) घोडके समाजसेवक सदस्य दीपक घोडके यांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी सामूहिक वंदना घेण्यात येऊन पुढे सायंकाळी ४:०० वाजता सर्व गावातील लहान थोर महिला भगिनी जयंती स्थळी उपस्थित राहून भंतेजी यांनी दिलेले प्रवचन ऐकले.

त्यावेळी भंतेजीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे डोक्यावर नाही तर डोक्यात घ्या त्यांचे विचार आत्मसात करण्याची काळाची गरज असून महापुरुषांच्या विचारांची जयंती साजरी करण्याचे आवाहन करत पुढच्या वर्षी हे डीजे सुद्धा बंद होतील. त्यामुळे तुम्ही डीजे मुक्त जयंती साजरी करण्याची सवय लावा म्हणजेच महापुरुषांच्या विचारांची देवाण घेवान होणे गरजेचे. पुढे जयंतीचे अध्यक्ष अतुल (दादा) शिंदे यांच्या सूचनेनुसार कोषाध्यक्ष युवराज वडमारे यांना सांगून अल्पो आहाराची व्यवस्था करण्यात आली. सर्वांनी अल्प आहाराचा लाभ घेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी महिला मुली लहान बालके त्यांनी मिरवणुकीत सहभागी झाल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या घोषणा देण्यात आल्या व पुढे काय डीजेच्या गाण्यावरती गावातील लहान थोर मोठ्याने मोठ्या उत्साहात आनंद साजरा करत शांततेत पार पडली. यावेळी जयंतीच्या अध्यक्ष अतुल (दादा) शिंदे, उपाध्यक्ष अशोक शिंदे, सचिव लक्ष्मण शिंदे, नितीन वडमारे, योगेश वडमारे, अशोक साळवे सह इत्यादींनी मोठ्या परिश्रमाने जयंती साजरी करण्यात आली.



बीड : चौसाळा येथील जेष्ठ पत्रकार शकिलभाई सय्यद यांनी मुंबई येथे खा. श्रीकांत शिंदे साहेब यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली.

# भागुजीराव ढेकळे विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा



गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए. एस. हे होते.

महाराष्ट्र दिनानिमित्त शाळेचे ध्वजारोहन प्राचार्य थिटे ए. एस. यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, राजेंद्र सोनवणे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय!

## मनोरंजन: अभिजात मराठी ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा



बीड । प्रतिनिधी

महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून,१ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला. या कार्यक्रमात मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत 'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.त्यामुळे मराठी मनोरंजनाला एक नवे दालन खुले झाले आहे.

एआय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही मायबोली अभिमानाने उभी राहावी,यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे. जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

यावेळी मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले, मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे.

मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार हेच आमचं ब्रीदवाक्य आहे, असे मत उदय सामंत यांनी व्यक्त केले. 'अभिजात मराठी' चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले 'अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ असून 'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार आहे.

# कनिष्का अग्रो सर्व्हिर्सस च्या भव्य शुभारंभ मांजरी फाटा बाराहाळी

मुखेड । प्रतिनिधी

आज उज्वलताई अरुणराव पत्रे (महिला काँग्रेस ता.अध्यक्ष मुखेड) यांच्या परिवारातील स्वप्नील पत्रे यांच्या कनिष्का अग्रो सर्व्हिसेसचा भव्य उदघाटन सोहळा, दि,३०/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०७ वाजता या कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण साहेब व माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या उपस्थिती संपन्न झाला. यावेळी पत्रे परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या उदघाटन सोहळ्याला राजनजी देशपांडे (उपाध्यक्ष काँग्रेस नांदेड), पंकज पाटील चव्हाण (नगरसेवक), विठ्ठलराव पाटील कोळनूरकर (संचालक), विठ्ठलराव पाटील गंगणबीडकर (कृषी उद्योजक), हनुमंतवाडीकर सावळे पाटील शिवाजी पाटील जाधव कृष्णूरकर संभाजी पाटील उंदरीकर, रमेश पाटील आमनार, अण्णासाहेब जहिरे, हनुमंतराव पाटील कोहिनूरकर, विलास पाटील इमडे, दिलीप पाटील बाजगिरे, अशोकराव वाघमारे, गंगाधर पाटील मांजरेकर, उज्वला ताई पत्रे, राजकुमार निळकंठ पाटील कोलनुरकर असं अनेक मान्यवर उपस्थित होते.



# केज येथील श्री स्वामी समर्थ मठाच्या सार्ध शतकपुर्ती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

केज । प्रतिनिधी



श्री स्वामी समर्थ मठ केज येथील श्री.स्वामी समर्थांच्या पादुका स्थापनेला दिडशे वर्ष (शतकोत्तर सुवर्ण महोत्सव) पुर्ण होत आहेत.त्या निमीत्त विश्वशांती व विश्व कल्याणासाठी पंचायतन यज्ञाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दिनांक ५ मे २०२५ सोमवार ते १२ मे २०२५ सोमवार या कालावधीत श्री स्वामी समर्थ मठामध्ये पंचायतन यज्ञ होणार आहे, यामध्ये पाच यज्ञ कुंड असणार आहेत. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या पंचदशाक्षरी नाम जपा चा दिनांक १४ डिसेंबर २०२४ (दत्त जयंती) या शुभ दिवसापासुन दिड कोटी जपाचा संकल्प करुन सुरुवात करण्यात आलेली होती. या नाम जपामध्ये केज शहर व परिसरातील सर्व स्वामी भक्त, सर्व समाजातील महिला पुरुष, युवक, युवती सहभागी झाले होते. त्यास महिला वर्गा तुन उस्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे.या पंचायतन यज्ञामध्ये श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या १५००००० पंधरा लाख नाम जपाचा स्वाहाकार होणार आहे.

प्रधान आचार्य श्री.श्रीराम रघुनाथबुवा जोशी यांच्या अधिपत्याखाली व वेदशास्त्र संपन्न ब्रम्ह वृंदाच्या मार्गदर्शना खाली सर्व धार्मिकविधी संपन्न होणार आहेत. यात दररोज सकाळी ५.३० वाजता काकडा आरती,सकाळी ६.०० ते ७.०० श्री स्वामी समर्थांना लघु रुद्राभिषेक, ७.३० ते १२.०० यज्ञ स्वाहाकार, १२.३० नैवेद्य व महा आरती, तसेच दुपारी ४.०० ते ६.०० ह.भ.प. श्री.भालचंद्र देव यांच्या मधुर वाणीतुन श्री स्वामी समर्थ कथामृत, तसेच सायंकाळी ७.०० ते ८.०० महाआरती व उपासना,सायंकाळी ८.३० ते ११.३० विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये पंडित शौनक अभिषेकी, पंडित जयंत केजकर, इंडियन आयडॉल धनश्री देशपांडे व राजश्री लेले, तसेच स्वरसरित सरिता परांडेकर यांचे भक्ति संगित-नाट्य संगित, किर्तनाचार्य ह.भ.प. डॉ.श्री.चारुदत्त आफळे, व ह.भ.प.किर्तन सम्राट समाधान महाराज शर्मा यांचे किर्तन वअभिजित धर्माधिकारी यांचे अंर्तमुख होणारे प्रवचन, मगरमिठी भजनी मंडळ कोल्हापुर यांचे भजन होणार आहे. दिनांक १२ मे २०२५ सोमवारी यज्ञाची पुर्णाहुती व दुपारी १.०० ते ५.०० महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ सर्व स्वामी भक्त व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ मठ संस्था व पं. पु.श्रीमंत नानासाहेब महाराज ऊर्फ महारुद्र देशपांडे प्रतिष्ठाण केज व समस्त केजकर देशपांडे व स्वामी समर्थ भक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पोखरी (घाट) गावात रंगलेल्या निकाली कुस्त्यांच्या दंगलीने कुस्तीप्रेमींची मने जिंकली

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पोखरी (घाट) गावात दि.२ शुक्रवार रोजी निकाली कुस्त्यांची दंगल लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणातील मैदानात कुस्त्यांची दंगल पार पडली. बीडचे खा.बजरंग बप्पा सोनावणे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट राजेंद्र मस्के, बंकटस्वामी मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण मेंगडे महाराज, बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम महाराज, चोरमले महाराज यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुस्ती दंगलीस प्रारंभ झाला.प्रारंभी लहान मुलांच्या व कुस्तीपटुंच्या कुस्त्या झाल्या. मात्र त्यानंतर पुणे, कोल्हापूर, अकलुज, अहिल्यानगर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या विविध भागातील कुस्तीपटुंच्या आखाड्यात कुस्त्या झाल्या. १००० रूपये पासुन ३१,००० रूपयापर्यंत बक्षिसांची रक्कम ठेवण्यात आली होती.




अंतिम लढत गणेश काळे मौलाली तालिम संघ भुम आणि कृष्णा पवार यांच्यात होऊन गणेश काळे विजयी झाले. त्यांचा स्मृती चिन्ह आणि ३१,००० रूपये रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. द्वितीय बक्षीस २५,००० रूपये बाळु बहिरवाल पाटोदा तालीम आणि तृतीय बक्षीस २१,००० रूपये मयुर कणसे आष्टी आणि संदिप लटके जामखेड या कुस्तीपटुंना विभागुन देण्यात आले. यावेळी पंचकमेटी म्हणून बाळासाहेब लेणे पुणे, गहिनीनाथ सिरसाट अहिल्यानगर, बाळासाहेब आवारे पाटोदा, दादासाहेब खिल्लारे आणि पोखरी (घाट) सरपंच बिभीषण मुळीक यांची उपस्थिती होती. कुस्ती बघण्यासाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमींनी तसेच लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

यावेळी महिलांची सुद्धा मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दादासाहेब खिल्लारे यांनी कुस्त्यांच्या दंगलीसाठी केलेले चोख नियोजन, परंडा येथील लक्ष्मण जाधव यांच्या हलगीच्या तालावर पाहुण्यांचे फेटा बांधून स्वागत, कुस्तीपटुंची ओळख, कुस्तीचे मोसीन अत्तार बार्शी यांची धावती कॉमेंट्री, कुस्तीपटुंना आखाडा जाम होऊन दुखापत होऊ नये यासाठी अधुनमधून रोटर फिरवून कुस्तीचे मैदान भुसभुशीत करणे आदी गोष्टी नजरेत भरणाऱ्या होत्या याचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या शाळेप्रमाणेच ग्रामीण भागातील युवावर्ग व्यसनमुक्त होऊन मैदानी खेळाकडे वळावा, ग्रामीण भागातील कुस्तीपटुंना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात येणार असुन उत्तरोत्तर भव्यदिव्य स्वरूपात कुस्त्यांच्या दंगली भरवण्यात येणार असल्याचे आयोजक दादासाहेब खिल्लारे यांनी सांगितले.

# पालकमंत्री अजितदादांच्या बीड जिल्ह्यात ११५ दिवसात ९० शेतकऱ्यांच्या आत्महत्या



बीड । प्रतिनिधी
अतिवृष्टीमुळे, नापिकी कर्ज आधी विविध कारणामुळे बीड जिल्ह्यात अनेक वर्षांपासून शेतकरी आत्महत्यांच्या घटना सातत्याने घडत आहेत. शेतीचा वाढलेला खर्च, नापिकी, कर्जबाजारीपणा, तसेच अतिवृष्टीमुळे होणारे शेतीपिकांचे नुकसान आदि कारणांमुळे शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. या आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तरीही शेतकरी आत्महत्यांच्या घटना थांबलेल्या नाहीत.

**शेतकरी आत्महत्या सन २०२५**

| | |
|---|---|
| जानेवारी | १९ |
| फेब्रुवारी | २५ |
| एप्रिल. (ता.२५ पर्यंत) | १९ |
| एकुण | ९० |
| मदतीस पात्र प्रकरणे | २७ |
| अपात्र प्रकरणे | ०५ |
| चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणे | ५८ |
| मदत दिलेली प्रकरणे | ० |

सन २०२५ या नविन वर्षात१ जानेवारी ते २५ एप्रिल २०२५ या दरम्यान ११५ दिवसात जिल्ह्यातील ९० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे. मात्र यातील एकही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या वारसांना शासकीय मदत मिळालेली नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजित दादा पवार यांच्या जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यानंतर शासकीय योजनांची व्यवस्थित अंमलबजावणी न केल्याने त्यांच्या कुटुंबीयांची आणखी परवडत होत असून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला सरकारकडून मिळणारे एक लाख रुपये मदत वेळेवर दिली जात नाही.

बीड जिल्ह्यात गेल्या ०४ महिन्यात ९९ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यातील ५८ प्रकरणे अद्यापही चौकशीसाठी प्रलंबित आहेत तर चौकशीनंतर २७ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरलेली आहेत परंतु अद्याप त्यांना सरकारची मदत मिळाली नाही. त्यामुळे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासाठी ही लाजिरवाणी बाब असुन तातडीने मदत देण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत.



### शेतकरी आत्महत्या मदतीची प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांचे आदेश पायदळी



शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मदत वेळेत संबंधित आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मिळाली पाहिजे. तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय यंत्रणेकडून आवश्यक अहवाल घेऊन चौकशी प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने १ महिन्याच्या आत मार्गी लावावीत अशा सूचना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी विभागीय आयुक्तांना सुचना देत शेतकरी आत्महत्या मदतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आढावा जाहीर केले आहे. मात्र प्रशासन स्तरावरील यंत्रणा ढिसाळ असल्याने याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे आदेश पायदळी तुडवल्याचे दिसून येत आहे.

## अद्याप एकाही आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या वारसांना शासकीय मदत नाही

# महसूल विभागाच्या आशीर्वादाने सिरसदेवी परिसरात मुरूमचे अवैध उत्खनन जोमात

### गेवराई तहसीलदार यांचे दुर्लक्ष

सिरसदेवी । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील २० किमी अंतरावर असलेल्या सिरसदेवी गावात व आजुबाजूच्या परिसरात मुरूम माफियांनी धुडघूस घातला असून मुरूम उत्खननाचा मुरूम माफियानी सपाटा चालविला आहे. सिरसदेवी परिसरातून हजारो ब्रास मुरूमचे बेकायदेशीरपणे उत्खनन होऊनही स्थानिक महसूल कर्मचारी धृतराष्ट्राच्या भूमिकेत आहेत. यामुळे मुरूम चोरीला आळा बसण्याऐवजी मुरूम उत्खनन व्यवसायाला महसूल विभागाच्या आशीर्वादाने गती मिळत असल्याचे दिसून येत असल्याने याला पाठबळ महसूल विभागाचे असल्याचा परिसरातील ग्रामस्थांचा आरोप आहे. सिरसदेवी परिसरात खुलेआम विना नंबरच्या हायवाने माती, मुरूम चोरीचे प्रस्थ वाढत असल्याचे सर्वत्र पहावयास मिळत आहे. शेतीचे उत्खनन करण्याच्या नावावर माती-मुरूमची बेकायदेशीररित्या तस्करी बिनधास्त हायवाने सुरू आहे. राजरोसपणे जेसीबी, पोकलॅण्ड मशीनच्या साहाय्याने नियमापेक्षाही जास्त जमीन खोदून मुरूम लंपास केला जातो. हा सगळा प्रकार इतका सराईतपणे होत आहे की, कुणालाच कायद्याची किंवा कारवाईची भीती वाटत नाही. याच्या पाठीमागे काय गौडबंगाल आहे, याचं गणित सामान्य माणसाला उलगडत नाही. कमी ब्रासची रॉयल्टी काढून जास्त ब्रास मुरुम काढणे किंवा शेकडो ब्रास रॉयल्टीच्या नावाखाली हजारो ब्रास मुरुम काढण्याच्या अनुचित प्रकाराने शासनाला लाखो रुपयांचा चुना लावल्या जात आहे. महसूल प्रशासनाने रॉयल्टी धारकांनी दिलेल्या नियोजित जागेवर जाऊन परवानगी आणि प्रत्यक्ष केलेले उत्खनन याची चौकशी करून कारवाई केल्यास रॉयल्टीच्या नावावर मोठे घबाड उघडे पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**प्रशासनाची डोळेझाक**

सिरसदेवी परिसरात नियमबाह्य मुरूमचे उत्खनन होत आहे. संबंधित व्यावसायिकांनी खनिकर्म व तालुका प्रशासनाची डोळेझाक करत बेकायदेशीररित्या केलेल्या उत्खननामुळे शासनाच्या महसुलाची मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून याकडे कुणाचेही लक्ष नाही. प्रशासनातील संबंधित अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवून जबाबदारी झटकण्यात व्यस्त आहेत. परिणामी रात्रंदिवस बेधडकपणे मुरूमची वाहतूक होत असून स्थानिक जबाबदार महसूल प्रशासनाने डोळेझाक केली आहे.

# अवैध ताडी विक्रीवर पेठ बीड पोलिसांचा छापा

## पेठ बीड पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व एपीआय पुजारी, पोलीस अंमलदार अल्ताफ शेख यांची उल्लेखनीय कामगिरी

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्ह्याला नव्याने लाभलेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या सिंघम कारवायाने आता बीड जिल्ह्यातील माफीयांचे धाबे दणाणले आहेत. यातच आज पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अवैधताडी विक्री प्रकरणी आज कारवाई करण्यात आली.
पोस्टे पेठ बीड गुरनं. व कलम १२७/२०२५ कलम ६५ (ई) मु.दा.का.प्रमाणे फिर्यादी- परमेश्वर कोंडीबा शिंदे वय ४९ वर्षे व्यवसाय नौकरी पोह १३० नेमणुक पोलीस ठाणे पेठ बीड यांच्या फिर्यादीवरून अवैधताळी विक्री करणारा इसम आरोपी - विकी विनायक भालशंकर वय २५ वर्षे रा. ईमामपुर रोड बार्शीनाका बीड ता.जि. बीड गु.घ. ता. वेळ व ठिकाण दि. ०२.०५..२०२५ रोजी १८.५० वाजता सोनाली लेडीज टेलर, बार्शी नाका ईमामपुर रोड बीड येथे गु.दा. ता. वेळ- दि. ०२.०५.२०२५ रोजी २३.१९ वा. दाखल मिळाला. माल-७,०००=०० एक निळ्या रंगाचे प्लास्टीकचे १०० लिटर चे ड्रम ज्यामध्ये पांढऱ्या रंगाची सिंधी (ताडी) दारुने भरलेले ड्रम प्रती लिटर विक्री किंमत अंदाजे ७० रुपये लिटर प्रमाणे एकुण ७,०००/- रुपये २) ४,९००=०० बिस्लरीच्या एक लिटर आकारमानाच्या प्लास्टीकच्या ७० बाटल्या ज्यामध्ये उग्रट वास येत असलेली पांढऱ्या रंगाची (सिंधी ताडी) दारु भरलेली एकुण ७० लिटर प्रती लिटर विक्री किंमत अंदाजे ७० रुपये लिटर प्रमाणे एकुण ४,९००/-रुपये एकुण ११,९००/- रुपये कि.अ. ठिकाणी यातील आरोपी हा प्रो गुन्हयाचा माल अवैध रित्या विनापरवाना बेकायदेशीर रित्या उग्रटवास येत असलेली पांढऱ्या रंगाची सिंधी अवैध (ताडी) दारु स्वतःच्या फायदयासाठी स्वतःच्या जवळ बाळगुन तीची चोरटी विक्री करीत असताना मिळुन आला म्हणुन मा.पो.नि.सो. यांचे आदेशाने गुन्हा दाखल करुन पुढील तपासकामी पोना १८३५ शिकेतोड यांचेकडे देण्यात आला. संबंधित हजारो लिटर अवैधताडी शिंदे ही नाली मध्ये होतो नष्ट करण्यात आलेली आहे.



**पोलीस ठाण्याच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी करावं तेवढं कौतुकास्पद कामगिरी**

काही दिवसापूर्वी वाहतूक शाखा हायवेवरून पेड बीड पोलीस ठाण्यांमध्ये शेख अल्ताफ नावाचा कर्मचारी हा पेठ बीड पोलीस ठाण्यामध्ये कर्तव्यावरती रुजू झाला आणि या कर्मचाऱ्यांनी पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील दोन नंबरचे गुटक्या वाले, दारू वाले, अवैध ताडी विक्री करणाऱ्या अनेक माफीयांच्या अंगावर थेट अंगावर जाऊन खाकी दाखवत पोलीसगिरी कशा पद्धतीने काम करतात हे जनतेला दाखवली व जनसेवा कश्या पध्दतीने करतात हे सिद्ध केलेले आहे. सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ शी बोलताना त्यानी सांगितले की, संबंधित कारवाई ही बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर डिवायएसपी विश्वांभर गोल्डे पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज एपीआय पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित कारवाई केली की पोलीस अंमलदार शेख अल्ताफ यांनी सांगितले. शेख अल्ताफ पोलीस कर्मचारी एक चांगल्या पद्धतीचं काम करत आहे अशी भावना पेठ बीड मधील नागरिकांकडून शेख अल्ताफ यांच्या कामाचं कौतुक होत आहे.

# पशुसंवर्धन विभागाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज दाखल करावेत : पवार

बीड । प्रतिनिधी
पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तीक लाभाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी शेतकरी व बेरोजगार तरुणांनी अर्ज दाखल करावेत असे आवाहन भाजपा पंचायत राज ग्रामविकास बीड तालुका अध्यक्ष श्री नरेश पवार यांनी केले आहे
लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तीक लाभाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी https://ah.mahabms.com हे संकेतस्थळ, मोबाईल ॲप MAHABMS व टोल फ्रि क्रमांक १९६२ देण्यात आला आहे. तरी पशुपालक शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी २ जून २०२५ पर्यत ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करावे, नाविण्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत दुधाळ गाई व म्हशीचे गट वाटप करणे, शेळी मेंढी गट वाटप करणे, १ हजार मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५+३ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रीया सन २०२५-२६ या वर्षात राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्याची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन भाजपा पंचायत राज ग्रामविकास बीड तालुका अध्यक्ष नरेश पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# भोगलवाडीच्या प्रा.आ.केंद्रात गोरगरीब रूग्णांना औषध नाही परंतु पुढाऱ्यांनी फोन करताच औषध उपलब्ध

### भेदभाव करणाऱ्यांवर कारवाई करा : तुकाराम तिडके

तेलगाव । प्रतिनिधी
भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारार्थ येणाऱ्या गोरगरीब रूग्णांना औषध नाही म्हणुन परत पाठवले जाते. मात्र त्याच रूग्णसाठी एखाद्या पुढाऱ्याने फोन केला तर लगेच औषध उपलब्ध करून दिले जाते, असा प्रकार या आरोग्य केंद्रात शुक्रवारी घडल्याने सर्वसामान्य नागरिकांतुन तीव्र संतापाची लाट निर्माण होत असुन, असा भेदभाव करणाऱ्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कडक व दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी उपसरपंच तुकाराम तिडके यांनी केली आहे.
यासंदर्भात माहिती अशी की, शुक्रवार दि.२ मे रोजी काटेवाडी ता.धारूर येथील उत्तरेश्वर तुकाराम हजारे या शेतकऱ्यास कुत्र्या चावल्याने तात्काळ जवळच असलेल्या भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारार्थ गेले. तेथे गेल्यावर तेथे उपस्थित कर्मचाऱ्यांना हजारे यांनी कुत्रा चावल्याने कुत्रे चावल्याचे इंजेक्शन देण्याची मागणी केली. मात्र उपस्थित कर्मचाऱ्यांनी कुत्रा चावल्यानंतरचे कुठलेही औषध अथवा इंजेक्शन येथे नाही. तुम्ही बीड, धारूर अंबाजोगाई यापैकी कुठेही जाऊन इंजेक्शन घ्या असा सल्ला दिला. यावर हजारे यांनी ही घटना उपसरपंच तुकाराम तिडके यांना सांगितली. तिडके बाहेरगावी असल्याने ग्रा.पं.सदस्य समाधान चांदणे यांना दवाखान्यात पाठवले. चांदणे यांनी तेथील करणाऱ्यांना हजारे यांच्यावर उपचार करा, असे म्हटले. तरीही कर्मचारी टाळाटाळ करू लागल्याने उपसरपंच तिडके व चांदणे यांनी फोनवर संबंधित डॉक्टरला चांगलेच फैलावर घेताच डॉक्टरने इंजेक्शन आहे लगेच देण्यास सांगतो, असे म्हटले. यावर उपसरपंच तिडके म्हणाले की, दवाखाना सर्वसामान्य नागरिकांसह सर्वांसाठी असतानाही तुम्ही गोरगरीब रूग्णाला औषध असतानाही देत नाहीत. हा मोठा गंभीर गुन्हा आहे. कुत्रा चावल्याने रूग्णाचे कांही बरेवाईट झाले तर त्यास कोण जबाबदार असणार, असा प्रश्न विचारत असा भेदभाव करणाऱ्यांवर वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी तात्काळ कडक कारवाई केली नाही तर यासाठी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा उपसरपंच तुकाराम तिडके, ग्राम पंचायत सदस्य समाधान चांदणे यांनी दिला.




**दांडी बहाद्दरांची संख्या जास्त**

डोंगरदऱ्यात असलेल्या भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह आरोग्य कर्मचारी सतत दांडी यात्रे असतात. त्यात जे कर्मचारी असतात तेही उपचारार्थ आलेल्या रूग्णाला उध्दट वर्तन करून मनमानी करतात. याची आरोग्य विभागाच्या वरिष्ठांनी गंभीरतेने दखल घेण्याची गरज आहे.

# पशुसंवर्धन विभागाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज दाखल करावेत : देशमुख

आष्टी । प्रतिनिधी
पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तीक लाभाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी शेतकरी व बेरोजगार तरुणांनी अर्ज दाखल करावेत असे आवाहन बीड जिल्हा भाजपचे अध्यक्ष श्री शंकर देशमुख यांनी केले आहे



लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या पशुसंवर्धन विभागाच्या वैयत्तीक लाभाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी https://ah.mahabms.com हे संकेतस्थळ, मोबाईल ॲप MAHABMS व टोल फ्रि क्रमांक १९६२ देण्यात आला आहे. तरी पशुपालक शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी २ जून २०२५ पर्यत ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करावे.
नाविण्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत दुधाळ गाई व म्हशीचे गट वाटप करणे, शेळी मेंढी गट वाटप करणे, १ हजार मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५+३ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रीया सन २०२५-२६ या वर्षात राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्याची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन शंकर देशमुख यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT